अपलिफ्ट इंडिया असोसिएशन - स्वाभिमान द्वारा

UpLift
Enriching lives of the poor...together

क्रमांक: ७
जानेवारी: २००७

# मनोगत

## संपादकीय...

### निवडणुका..

एकदा शिवाजी महाराजांना स्वर्गात कंटाळा येतो. तेव्हा लहानपणीच्या आठवणी ताज्या करण्यासाठी ते पुण्यात यायचं ठरवतात. बघतात तर पुणे एकदम बदललेले असते. काळी मुठा नदी, खड्डयाखड्डयांचे रस्ते, भंगार पी. एम्. टया..महाराज चिडतात व म.न.पा. च्या ऑफिसमध्ये जातात. तिथे बघतात तर पायऱ्या-पायऱ्यांवर थुंकीचे डाग, कोपऱ्या-कोपऱ्यावर शिपाई झोपलेले...महाराज अजूनच चिडतात. लढाईच्याच मूडमध्ये येतात व जोरात विचारतात, कोण आहे इथला राजा? एक शिपाई जागा होतो व आयुक्तांच्या ऑफिसकडे बोट दाखवतो. आयुक्त महाराजांचा अवतार व तलवार बघून शांतपणे म्हणतात, लढायचंच असेल तर निवडणुका लढवा!

दुसऱ्या दिवशी महाराज लगेचंच उमेदवारी अर्ज भरण्यासाठी सरकारी कचेरीत जातात. बघतात तर तिथे काही जण एकदम महाराजांसारखेच मुखवटे घालून आलेले असतात. सोबत मावळेही असतात. दुसरीकडे काही जण गांधीजींचा मुखवटा घालून तर काही आंबेडकरांचा मुखवटा घालून अर्ज भरत असतात. महाराज डिपॉझिट भरतात व प्रचाराला निघतात. मार्केटयार्डाच्या बाजूच्या तबेल्यातून एक घोडा भाड्याने घेतात.

सर्वप्रथम शिवाजीनगरला सभा घ्यायचे ठरवतात. बघतात तर तिथे गांधीजींचा मुखवटा घातलेला कुणीतरी आंबेडकरांचा मुखवटा घातलेल्याबरोबर हातात हात घालून फुलांचे वाटप करत असतो. तिथे घोड्याच्या पार्किंगसाठीही जागा नसल्यामुळे महाराज लगेचच कोथरूडच्या शिवाजी पुतळ्याकडे कूच करतात. बघतात तर तिथे कुणीतरी महाराजांचा मुखवटा घालून भाषण देत असतो. महाराज लगेच अ.ब. चौकात जातात, तिथे तर इंदिरा गांधींचा मुखवटा घातलेली एक महिला टी.व्ही. वाटप करत असते. बघता-बघता रात्र होते. महाराजांना शनिवारवाड्यापाशी एक मोठी जत्राच दिसते. जत्रेत काही मावळे जे दुपारी महाराजांचा मुखवटा घतलेल्यांबरोबर होते ते गांधीजींचा मुखवटा घातलेल्याच्या मागे मंडईच्या दिशेने जात असतात. कुणीतरी महाराजांना हे सगळे पार्टीसाठी नाही तर पार्टीला चालले आहेत असे सांगतो!

दोन तीन दिवसांनी महाराजही पेपरमधून एका भव्य सभेची घोषणा करतात. सभेचे ठिकाण अलका टॉकिज चौक, सर्वांना निमंत्रण, आपला शिवाजीमहाराज भोसले. दुसऱ्या दिवशी सभेला बघतात तर फक्त महाराजांच्याच आडनावाचे लोक आलेले असतात. चिडून ते सभाच रद्द करतात.

निवडणुका जवळ येतात. अचानक एकदिवस कोणीतरी गांधीजींच्या पुतळ्याला चपलांचा हार घातला असे ओरडत येतो तर तिकडे कोणीतरी सावरकरांचा पुतळाच पळवून नेतात. त्याच दिवशी रात्री सगळे हसत-हसत पुन्हा मंडईकडे जाताना महाराजांना दिसतात.

मतदानाच्या दिवशी महाराज सगळ्यात पहिल्यांदा मतदान करायचे ठरवतात. मतदान केंद्रात जातात तर तिथे यादीत महारांजांचे नावच नसते! बाहेर हळूहळू गर्दी होते. तलवारी भरून गाड्या व गाड्या भरून माणसे येतात. तर दुसरीकडे गुलाबाच्या फुलांचे व शंभरच्या नोटांचे वाटप सुरू असते. निकाल लागतो.

महाराज ठरवतात की जिंकलेल्यांना चांगली अद्दल घडवायची. तडक ते म.न.पा मध्ये जातात. तिथे जिंकलेल्यांची सभा चालू असते. बाहेर चपला व मुखवटे पडलेले असतात. बाहेर वाट बघत बसलेल्या महाराजांना एक शिपाई म्हणतो, मुखवटा व चपला काढून आत जा. हे सगळे आता पाच वर्षांनीच बाहेर येतील!

लोकशाही चांगलीच आहे,फक्त प्रजेला खऱ्या-खोट्याची ओळख हवी असे म्हणत महाराज स्वर्गात परततात.

सर्वांना नवीन वर्षाच्या, २६ जानेवारीच्या व फेब्रुवारीच्या पालिका निवडणुकीच्या हार्दीक शुभेच्छा!!




## चिकाटी हवी!

(छोट्याशा टपरीवजा हॉटेलमध्ये हरबा चहा पीत आहे. तेवढ्यात त्याला केरबा दिसतो.)

हरबा : (केरबाकडे पाहून) केरबा SS इकडे ये च्या घ्यायला.

केरबा : (हरबाकडे येतो) निवांत दिसतोस! कसं काय चाललंय?

हरबा : तसं बेस चाललंय पण इथं बघितल्यावर वाटतं, की आपण चहाची टपरी टाकली असती तर बरं झालं असतं!

केरबा : ते का म्हणून?

हरबा : गर्दी बघ इथे. त्येला पैसे घ्यायला येळ नाही. ते बी सावलीला बसून आणि मी दिवसभर ढकलतोय हातगाडी.

केरबा : (हसून) तुला माहीत आहे ना, त्याने दहा वर्षं पोऱ्या बनून कप-बश्या इसळल्यात तवा आताचे दिवस बघतोय तो. त्या येळेला तू त्याच्यापेक्षा जास्त कमाई करायचास न्हवं. पण म्हणून जर त्यानं तुझ्या धंद्यात पडायचा विचार केला असता तर इथपर्यंत आला असता का?

हरबा : (भुर्र्रक) हं. (भुर्र्रक)

केरबा : कुठला बी धंदा वाईट नाही. चिकाटी पायजे बघ. चिकाटी असली म्हंजे भल्या-बुऱ्या अनुभवातून माणूस तयार होतो. त्यासाठी धंद्यातली युगत शिकायची पण तयारी पाहिजे. धरसोडपणा काय कामाचा. नायतर एक ना धड भाराभर चिंध्या नुसत्या.

हरबा :(कप बशीमध्ये फिरवत केरबाकडे पहात रहातो)

केरबा : मार्केटयार्डातला मोटार घेऊन येणारा व्यापारी पण भाजीच इकतो अन् तू पण. फरक कुठं हाय ते आपणच बळखायचं अन् चिकाटी धरायची तिथपर्यंत पोचायची... काय करायचं ते तूच ठरव. मग येऊ तुज्या टपरीवर च्या प्यायला पुढल्या येळेला?

हरबा : पेशल च्या देनार तुला, ते बी पैसे न घेता. पन टपरीवर नाय...माज्या भाजीच्या स्टॉलवर...

# आपले आरोग्य आपल्या हाती

× की ✓ ते तुम्हीच ओळखा!

## ~डोळ्यांची निगा



















या महिन्याची गुरुकिल्ली

वापरू माहितीचा अधिकार..
उगारू मतदानाचे शस्त्र.
आळशी व पोटभरु नगरसेवकांचे,
उतरवून टाकू ढोंगी वस्त्र.

### महिन्यातील ठळक बातमी

अखेर 'डिस्कव्हरी' अंतराळात!

ह्यूस्टन, १० डिसेंबर/पी.टी.आय. (लोकसत्ता)

अमेरिकेचे बहुचर्चित 'डिस्कव्हरी' हे अंतराळ यान आज अखेर यशस्वीपणे अंतरिक्षात झेपावले. या यानातील ७ अंतराळवीरांमध्ये सुनीता विल्यम्स हिचाही समावेश आहे. अंतराळात जाणारी सुनीता ही कल्पना चावलानंतर भारतीय वंशाची दुसरी अंतराळवीर बनली आहे.

अंतरिक्षातील 'आंतरराष्ट्रीय स्पेस स्टेशन'च्या दुरुस्ती व देखभालीच्या मोहिमेवर डिस्कव्हरी अंतराळात झेपावले.

भारतीय वंशाची सुनीता विल्यम्स ही अंतराळवीर या मोहिमेतील एक प्रमुख सदस्य आहे. डिस्कव्हरी १२ दिवसांनंतर माघारी परतणार असले तरी सुनीता पुढील ६ महिने स्पेस स्टेशनवरच मुक्काम करणार आहे. ४१ वर्षांची सुनीता ही अमेरिकी नौदलाची माजी टेस्ट पायलट आहे. या मोहिमेवर फ्लाईट इंजिनियर म्हणून तिची निवड झाली आहे. सुनीता ही भारतातून अमेरिकेत स्थायिक झालेल्या डॉ. दीपक पंड्या यांची मुलगी आहे. मात्र तिचा जन्म व सर्व शिक्षण अमेरिकेतच झाले आहे.